# सार्वजनिक आरोग्य अभियंता (पाणी पुरवठा विभाग )

## पाणी पुरवठा संबंधीचे निवेदन

सोलापूर शहरास पाणीपुरवठा करणारे उजनी -सोलापूर मुख्य पाईप लाईन योजने अंतर्गत अमृत योजनेतून दीर्घकालीन पाणी पुरवठा सुधारणा करण्यासाठी मुख्य पाईप लाईनवरील २४ एअर व्हॉल्व/ स्लुस व्हॉल्व बदलणे, तीन एक्सपान्शन जॉईंट बदलणे, मडकी वस्ती ते जूना पूना नाका चौकापर्यंत नव्याने घातलेल्या ११०० मी.मी. व्यासाची एम.एस. पाईप लाईनची मुख्य पाईप लाईनला जोडणी करणे, उजनी-सोलापूर पाईप लाईनवरील गळती दुरुस्ती करणे इ. विविध कामे करणेचे आवश्यक काम हाती घेणेत येणार असून त्यामुळे शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत होणार आहे. सदरचे कामे करणेसाठी उजनी ते सोलापूर थेट पाईप लाईन योजना साधारणतः ४८ तासासाठी बंद राहणार आहे. त्यामुळे दुरुस्ती करिता उजनी येथील पंप दि २३.१०.२०१८ रोजी रात्री १२.०० पासुन बंद ठेवावे लागणार आहेत. सदर दुरुस्तीचे काम सोलापूर महानगरपालिकेमार्फत दि २४.१०.२०१८ रोजी हाती घेणेत येणार आहे. दुरुस्ती करिता साधारणपणे ४८ तासाचा कालावधी लागणार आहे. दरम्यानचे कालावधीमध्ये उजनी - सोलापूर दरम्यानची मुख्य पाईप लाईन वरुन येणारा पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

उपरोक्त कारणामुळे उजनी पाईप लाईनवर अवलंबून असलेला दि २४.१०.२०१८ रोजीचा देगांव, मरीआई चौक, शेटे वस्ती, यतिम खाना, राजस्व नगर, मुरारजी पेठ परिसर,डी.सी.सी बँक कॉलनी,निर्मिती विहार, विजय देशमुख नगर,भुषण नगर, धोंडीबा वस्ती या भागाचा पाणी पुरवठा दि २६.१०.२०१८ पहाटे पासून सुरु होणाार आहे. शटडाउनच्या कारणामुळे उजनी पाईप लाईनवर अवलंबून असलेल्या बाळे, सलगर वस्ती, अवंती नगर परिसर, उत्तर कसबा, इंदिरा नगर, रामलिंग सोसायटी, भुषणनगर, गरीबी हटाव झोपडपट्टी नं १ व २, शहानगर, ईराण्णा वस्ती, आदित्यनगर, माशाळ वस्ती, गणेश नगर, नालंदानगर, गवळी वस्ती, आंबेडकर नगर, विद्याननगरी, साईधन नगर, सेटलमेंट, रामवाडी, सिटिजन पार्क, दक्षिण कसबा, कस्तुरबा टाकी,दयानंद टाकी व नेहरू नगर या परिसराचा पाणी पुरवठा एका वेळेस पाच दिवस आड व उर्वरीत शहराचा पाणी पुरवठा एक वेळेस चार दिवसाआड होईल.

तसेच संपूर्ण शहराला दि २४.१०.२०१८ ते दि ३०.१०.२०१८ या कालावधीत शहर व हद्दवाढ भागातील पाणीपुरवठा उशीरा, कमी वेळ व कमी दाबाने होणार आहे.

तसेच सदरचे कामा अंतर्गत मडकी वस्ती ते जुना पुणे नाका चौकापर्यंत नव्याने टाकलेल्या ११०० मिमि व्यासाची एम.एस. पाईप लाईनचे मुख्य पाईप लाईनला जोडणीचे काम होणार आहे. काम पूर्ण झालेनंतर म.न.पा. कडून पाईप लाईन पूर्णपणे वॉशआऊट करुन पाणी पुरवठा करणेत येणार आहे. तथापि दरम्यानच्या काळात सुरुवातीस एखादे दिवस काही प्रमाणात गढूळ पाणी पुरवठा होणेची शक्यता नाकारता येत नाही. त्या कालावधीत नागरीकांनी सदरचे पाण्याचा पिण्यासाठी वापर करताना पाणी उकळून पिणे बाबतची कार्यवाही ठेवावी असे महानगरपालिकेकडून नागरीकांना अवाहन करणेत येत आहे. सदर कालावधीत पाणी पूरवठा वेळा पत्रक व इतर तक्रारीचे अनुषंगाने सेग्रीगेशन स्टोअर येथील ०२१७-२७४०३६२/६३ या दुरध्वनीवर कृपया संपर्क साधावा.

तरी कृपया नागरीकांनी उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे, हि विनंती आहे.

२३/१०/१८

प्र. सार्वजनिक आरोग्य अभियंता
सोलापूर महानगरपालिका सोलापूर